# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

// प्रेस नोट //

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

मिरा-भाईदर महानगरपालिकेस स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीकडून दररोज 86.00 द.ल.ली. व महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून 125 द.ल.ली. असा एकुण 211 द.ल.ली. पाणी पुरवठा मंजूर आहे. सध्या पाण्याची गरज 211 द.ल.ली. एवढी असून प्रत्यक्षात 180 द.ल.ली. पाणी प्राप्त होत होते. पाणी पुरवठा तुट 31.00 द.ल.ली. एवढी होती.

मिरा-भाईदर शहरास महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाकडून सरासरी 94 ते 95 द.ल.ली. पाणी पुरवठा होत होता. त्यानूसार मंजूर कोट्यापेक्षा शहरास 30 ते 31 द.ल.ली. पाणी कमी प्राप्त होत होते. तसेच उल्हास नदी पाणी नियोजन सन 2020-21 अंतर्गत ठाणे पाटबंधारे विभागामार्फत दि.19/01/2021 पासून पाणी वापर संस्थांना पंधरा दिवसातून 1 दिवस 24 तास पाणी कपात लागू करण्यात आलेली होती.

स्टेम व एम.आय.डी.सी. यांचे संबधित अधिकारी समवेत दि.07/04/2021 रोजी मा. आयुक्त साहेब यांच्या दालनात उपलब्ध पाणी पुरवठा वाढविणे करीता बैठक घेण्यात आली होती. तसेच मा. आयुक्त साहेब यांनी वारंवार पाठपुरावा करून पाणी पुरवठ्यात वाढ करणेकरीता युद्धपातळीवर प्रयत्न केलेले आहेत. तसेच शहरास लागू केलेली पाणी कपात रद्द करणेबाबत सातत्याने पाठपुरावा करून मिरा-भाईदर शहरास लागू असलेली पाणी कपात रद्द केलेली आहे.

मा. आयुक्त साहेब यांनी वरीलप्रमाणे केलेल्या प्रयत्नांमुळे स्टेम प्राधिकरणाकडून यापुर्वी सरासरी प्राप्त होत असलेले 82 द.ल.ली. पाण्यामध्ये वाढ होऊन सद्यस्थितीत 86 द.ल.ली. पाणी प्राप्त होत आहे. तसेच एम.आय.डी.सी. तर्फे मंजूर कोटयापैकी सरासरी 95 द.ल.ली. पाण्यामध्ये वाढ होऊन सद्यस्थितीत सरासरी 112 द.ल.ली. पाणी प्राप्त होत आहे. त्यानूसार शहरातील पाणी पुरवठ्यामध्ये एकुण सरासरी 21 द.ल.ली. प्रतीदिन वाढ करण्यात यश आले आहे.

त्यामुळे पुर्वी शहराचा 50-55 तासांवर जात असलेला पाणी पुरवठा सद्यस्थितीत 32 ते 36 तासांवर व गांवठण परिसरातील पाणी पुरवठा 24 तासांवर आणण्यात यश आले आहे

तथापी, सर्व नागरीकांनी पाण्याचे महत्व ओळखुन पाण्याचा काटकसरीने व जपुन वापर करावा असे आवाहन मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.